**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

# कै. नागोरावजी जयरामजी मेटकर स्मृतिप्रित्यर्थ
# श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार नामांकनाकरीता आवेदनपत्र आमंत्रित
# आवेदनपत्रे स्वीकारण्याची अंतीम तारीख १० ऑक्टोबर

अमरावती -

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातर्फे आणि दानदाते श्री द.ना. उपाख्य बबनराव दादा मेटकर यांच्याकडून प्राप्त झालेल्या दाननिधीमधून कै. नागोरावजी जयरामजी मेटकर स्मृतिप्रित्यर्थ श्री संत गाडगेबाबा सामाजिक कार्य पुरस्कार २०२० प्रदान करावयाचा आहे.

श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार महाराष्ट्र राज्यातील श्री संत गाडगेबाबांच्या विचाराशी बांधील असणारी व्यक्ती किंवा संस्थेला देण्यात येईल. पुरस्कारासाठी एखाद्या व्यक्तीने/संस्थेने स्वतःहून नाव सादर करणे किंवा दुस-या कोण्या एखाद्या व्यक्तीची /संस्थेची पुरस्कारासाठी शिफारस करणे किंवा नाव सूचविणे दोन्ही पध्दतीने नामांकन अर्ज स्वीकारण्यात येतील. संस्था किंवा व्यक्तीगत आवेदकांनी नामांकन आवेदन पत्रासोबत आपल्या जीवनाचा सविस्तर आलेख आणि पुरस्काराकरीता निश्चित केलेल्या निकषानुसार सामाजिक क्षेत्रात कार्य केल्याचा पुरावा पाठविणे आवश्यक आहे.

श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कारासाठी ३० सप्टेंबर, २०२० ही तारीख देण्यात आली होती, परंतु काही अपरिहार्य कारणामुळे काही आवेदनपत्रे विद्यापीठातर्फे स्वीकारण्यात आली नाही. सदर आवेदनपत्रे स्वीकारण्याच्या तारखेत विद्यापीठातर्फे मुदतवाढ देण्यात आली असून आवेदकांनी आता दिनांक १० ऑक्टोबर, २०२० पूर्वी विहीत प्रपत्रातील नामांकन आवेदनपत्र पांच प्रतीत "कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ", अमरावती-४४४६०२ या पत्त्यावर पाठवावीत. नामांकन आवेदनपत्र पाठवितांना लिफाप्यावर " कै. नागोरावजी जयरामजी मेटकर स्मृतिप्रित्यर्थ श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार" नामांकनाकरीता आवेदनपत्र हे ठळक अक्षरात लिहावे. विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www.sgbau.ac.in) सदर नामांकन आवेदनपत्र विहीत प्रपत्रात देण्यात आले आहे. विद्यापीठाव्दारे संकेतस्थळावर दिलेल्या नामांकन आवेदनपत्रानुसार ए-फोर साईज मधीलच संगणकीय नामांकन आवेदनपत्र स्वीकारण्यात येईल. विना प्रपत्र पाठविलेला अर्ज रद्द करण्यात येईल, याची दक्षता संबंधितांना घ्यावयाची आहे. यापूर्वी अनेक मान्यवर व्यक्तींना हा पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले आहे.

सन २०२० चा पुरस्कार प्राप्त करण्यास इच्छुक व्यक्तींनी / संस्थेंनी विद्यापीठाचे संकेतस्थळावर (www.sgbau.ac.in) विहीत प्रपत्रातील नामांकन आवेदनपत्र व पुरस्काराचे निकष यांची माहिती करून घ्यावी. अधिक माहितीसाठी विद्यापीठाशी संपर्क साधता येईल, असे विद्यापीठाच्यावतीने कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांनी कळविले आहे.

---

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै.............................. अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. ०३/१०/२०२०.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

प्र. जनसंपर्क अधिकारी